

मुलाखत
**देबाल देब**

संवादक
**गुरुदास नूलकर**

# पारंपरिक वाणांच्या जतनातूनच शेती वाचेल

**ओडिशास्थित देबल देब यांचं नाव आज देशातील भाताच्या पारंपरिक वाणांची जोपासना करणाऱ्यांमध्ये अग्रणी मानलं जातं. पारंपरिक बियाणं नामशेष होत जाण्याचा प्रवास आणि हरित क्रांतीचे दुष्परिणाम यांचा देब यांनी केलेला अभ्यास देशातील शेती मोडकळीस येण्यामागच्या कारणांवर प्रकाश टाकतो. पारंपरिक वाण संपत गेल्याने शेती परावलंबी तर बनलीच, पण देशात पोषण विषमता तयार झाली, असं मांडणाऱ्या देब यांच्याशी त्यांच्या कामाच्या अनुषंगाने गुरुदास नूलकर यांनी साधलेला संवाद.**

▶ खादीचा सदरा, पाठीवर एक सॅक, गळ्यात शबनम, पायात चप्पल आणि हातात बियाणांची मोठ्ठी पिशवी. साठीच्या घरातला कणखर बांध्याचा हा माणूस प्रथमदर्शनी एखाद्या संस्थेचा कार्यकर्ता वाटतो. खरोखरच देबाल देब हे जसे पट्टीचे संशोधक आहेत तसेच हाडाचे कार्यकर्तेदेखील.

**शेतीशास्त्राचं शिक्षण नसताना किंवा शेती कुटुंबात वाढलेले नसतानाही भातशेती आणि पारंपरिक वाणांच्या संशोधनाकडे आपण कसे वळलात?**

पदवी वनस्पतिशास्त्राची असली तरी माझी डॉक्टरेट जनुकीय विविधता (जेनेटिक डायव्हर्सिटी) यातली आहे. डॉक्टरेट झाल्यावर मी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये दोन वर्षं पोस्ट-डॉक्टरेट अभ्यास केला. ते संपवून मी जेव्हा कोलकत्याला परत आलो तेव्हा भातशेतीतले प्रसिद्ध शास्त्रज्ञ आर. एच. रिचारिया यांच्या कामाबद्दल माझ्या वाचण्यात आलं. त्यांनी एके ठिकाणी म्हटलं होतं, की हरित क्रांती होण्याआधी जगात दोन लाख प्रकारच्या भातांचे वाण होते. काही समनामांचे वाण काढले तरी सुमारे एक लाख दहा हजार वाण तर नक्कीच होते. हरित क्रांतीच्या संशोधनासाठी नेमलेल्या फिलिपिन्स आणि मेक्सिकोमधील दोन संस्थांनी सुरुवातीला बाजारात भाताचे संकरित वाण आणि आज जेनेटिकली मॉडिफाइड (जी.एम.) म्हणून ओळखली जाणारी बियाणं आणली. या वाणांना ‘हाय यिल्ड व्हरायटी’ म्हणजे ‘अधिक उत्पन्नाच्या जाती’ असं संबोधलं गेलं. एखादं बियाणं

'अधिक उत्पन्न' देणारं आहे असं म्हटलं की इतर बियाणं कमी उत्पन्न देणारं असणार, असा समज साहजिकच शेतकऱ्यांमध्ये पसरला. अनिश्चित हवामान, बाजारभावाचे चढ-उतार आणि वाढत्या महागाईने ग्रासलेले शेतकरी या वाणांकडे आकर्षित झाले. अनेक देशांमध्ये तिथल्या सरकारनेही हरित क्रांतीला पाठिंबा देत या वाणांचा प्रचार केला. यामुळे हरित क्रांतीच्या जेमतेम पन्नास वर्षांत भाताच्या सुमारे ९० टक्के पारंपरिक जाती नाहीशा झाल्या आणि संकरित वाणांची लागवड सर्वत्र सुरू झाली. भारतही त्याला अपवाद नव्हता.

डॉ. रिचारियांच्या अभ्यासातली ही आकडेवारी ऐकून मला मोठा धक्का बसला. बियाणांचे हे संकरित वाण आपल्या देशाला कितपत योग्य आहेत, त्यांचं पोषणमूल्य किती आहे, आपले पारंपरिक वाण खरोखरच या वाणांपेक्षा कमी प्रतीचे आहेत का, असे अनेक प्रश्न मला पडले. त्या काळी भारतातील अनेक संस्था संकरित वाणांचा अभ्यास करत होत्या, पण पारंपरिक वाणांकडे त्यांचं पूर्ण दुर्लक्ष होत होतं. आपली शेती आणि शेतकरी वाचवायचा असेल तर देशातील भौगोलिक विविधतेतून आणि हजारो वर्षांच्या उत्क्रांतीतून घडलेले पारंपरिक वाण वाचवणं आणि त्यांचा सखोल अभ्यास करणं अत्यंत गरजेचं आहे, असं माझ्या लक्षात आलं. माझ्या जनुकीय अभ्यासाचा इथे उपयोग करून घेता येऊ शकेल असंही मला वाटलं.

त्यानंतर वर्ल्ड वाइल्ड लाइफ फंडची नोकरी सोडून मी ओडिशामध्ये भाताच्या वाणांचे प्रयोग करण्यासाठी एक शेत घेतलं. शेतकऱ्यांना भेटून मी भाताचे पारंपरिक वाण जमवायला लागलो. या भटकंतीत माझ्या असं लक्षात आलं, की दिवसेंदिवस या पारंपरिक वाणांची लागवड कमी होत चालली होती आणि शेतकऱ्यांच्या येणाऱ्या पिढ्या संकरित जातींकडे वळत होत्या. काही वर्षांतच उरलेसुरले वाणही गायब होणार हे उघड होतं. त्यामुळेच या वाणांचं जतन करण्यासाठी काम करण्याचं मी ठरवलं. तेव्हापासून ओडिशामधील रायगडा जिल्ह्यात माझे हे प्रयोग चालू आहेत. या प्रकल्पाचं नाव आहे 'बसुधा'.

**तुमचं काम प्रामुख्याने बंगाल आणि ओडिशा येथील भातांच्या जातींवर आहे. या प्रदेशातील भातशेतीत तुम्हाला काय आढळलं?**

बंगालमधील भाताच्या पारंपरिक वाणांची दप्तरी नोंद आहे का याचा शोध मी घेऊ लागलो तेव्हा मला तसं कोणतंही रेकॉर्ड मिळालं नाही. शेवटी मी फिलिपिन्समधील इंटरनॅशनल राइस रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये चौकशी केली. या इन्स्टिट्यूटमध्ये १९६५ साली बंगालमधून भाताचे ४५६० वाण संशोधनासाठी आले होते. यावरून या संस्थेने बंगालमध्ये त्या काळी ५५०० वाण असतील असा अंदाज लावला. मग मी बंगालमधील शेतकऱ्यांमध्ये शोध घ्यायचं ठरवलं. पहिल्या वर्षी मला फक्त ३०० पारंपरिक वाण मिळाले. हे काम गेली पंचवीस वर्षं सुरू आहे. त्या काळात आम्हाला फक्त ४५० वाणांचा शोध लागला आहे. ४५० वाणांचा हा बंगालमधला सर्वांत मोठा संग्रह आमच्या 'बसुधा' संस्थेमध्ये आहे. यावरून आपल्याकडेही हरित क्रांतीच्या काळात ९० टक्के वाण नाहीसे झाले, असा अंदाज बांधता येतो. भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या (आय. सी.ए.आर.) अंदाजाने संपूर्ण भारतात एक लाख दहा हजार जातींपैकी आज भाताच्या फक्त ७००० जाती शिल्लक असतील.

त्याही वेळी आपल्या देशात वाघ, गेंडा, माळढोक अशा नजरेत येणाऱ्या प्रजातींच्या रक्षणासाठी मोठा लढा चालू होता, परंतु भाताच्या जनुकीय विविधतेचा किती मोठ्या प्रमाणात नाश होत आहे याबाबत मात्र कमालीची अनास्था होती. सामान्य नागरिक तर सोडाच, पण शास्त्रज्ञांमध्येही याबाबत जागृती नव्हती. त्यामुळे देशातील भातवाणांच्या विविधतेच्या रक्षणासाठी हा लढा आम्ही चालू केला.

**पण हरित क्रांतीतून आपण शेतीत स्वयंपूर्ण झालो. संकरित वाणांनी व तंत्रज्ञानाने आपल्याला अन्नसुरक्षा मिळाली याची दाखल घ्यायला नको का? पारंपरिक वाणाने हे शक्य होतं का?**

पहिली गोष्ट अशी, की आपण शेतीत स्वयंपूर्ण आहोत हा समज साफ चुकीचा आहे. आपल्याला मोन्सँटो, सिंजेन्टा आणि केमचायना अशा अमेरिकन आणि चायनीज कंपन्या बियाणं पुरवतात. बायर, बी.ए.एस.एफ. डाव, ड्यूपोंत अशा जर्मन, अमेरिकन आणि जपानी कंपन्यांच्या तंत्रज्ञानाने खतं आणि कीटकनाशकं तयार होतात. देशात पाण्याचे पंप जपानी, ब्रिटिश आणि जर्मन

**आपल्या देशात अन्नसुरक्षा आहे का? आज हजारो टन अन्न गोदामात पडून आहे. खुद्द शेतकऱ्यांना स्वतःसाठी अन्नधान्य विकत घ्यावं लागतं. अन्नसाठा म्हणजे अन्नसुरक्षा नव्हे. अन्नाचं वितरण चुकीचं होत असल्याने अन्नसाठे वाया जात आहेत. त्याहून महत्त्वाचं म्हणजे आज देशात फार मोठ्या प्रमाणात पोषण विषमता आहे. पोट भरणं आणि पोषण मिळणं या दोन भिन्न गोष्टी आहेत.**

कंपन्यांशी सहकार्य करून आले. आजही त्यात के. एस.बी. आणि सिमेन्ससारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्या आहेत. यामुळे झालं काय, तर आपल्या शेतकऱ्यांनी बिया साठवण करण्याच्या पारंपरिक पद्धती सोडून दिल्या. शेतीची अवजारं बनवण्याची कला संपून गेली. सेंद्रिय शेती मागे पडली आणि पारंपरिक शेती पद्धती सोडून संपूर्ण देश एकसुरी लागवडीच्या मागे लागला. फक्त आठ ते दहा कंपन्या मिळून जगातील शेतीचा सर्व कच्चा माल बनवतात. आपली शेती पूर्णपणे या कंपन्यांवर अवलंबून आहे. अशा परिस्थितीत आपली शेती स्वायत्त किंवा स्वयंपूर्ण आहे, असं कसं म्हणता येईल?

दुसरं म्हणजे आपल्या देशात अन्नसुरक्षा आहे का, हा प्रश्न. आज हजारो टन अन्न गोदामात पडून आहे, वाया जात असतं, हे आपण वाचतो. तरीही भूक बळी आहेतच ना? खुद्द शेतकऱ्यांना स्वतःसाठी अन्नधान्य विकत घ्यावं लागतं. कर्जबाजारी शेतकरी तेही घेऊ शकत नाहीत. याचा अर्थ अन्नसाठा म्हणजे अन्नसुरक्षा नव्हे. अन्नाचं वितरण चुकीचं होत असल्याने अन्नसाठे वाया जात आहेत. त्याहून महत्त्वाचं म्हणजे आज देशात फार मोठ्या प्रमाणात पोषण विषमता आहे. पोट भरणं आणि पोषण मिळणं या दोन भिन्न गोष्टी आहेत. गरीबवर्गाचं पोट भरत असेल, पण कमकुवत पोषणामुळे त्यांच्यात आजार आणि साथी वारंवार येत राहतात. त्याचा खर्च वाढतो. उदा. हरित क्रांतीनंतर आपण पाम तेलाची आयात सुरू केली. हे तेल साता समुद्रापलीकडून आणलं तरी स्वस्त पडतं. त्यामुळे याचा वापर वाढत गेला. खाद्यतेलामध्ये पाम तेलाचं मूल्य अगदी खालच्या स्तराचं असतं; पण ते गरीब वर्गाला परवडत असल्यामुळे त्याचा वापर वाढला आणि पारंपरिक तेलाचा वापर कमी होत गेला.

आणखी एक मुद्दा असा, की आज शेतकरी पिकांची निवड बाजारभावावर करतात. खपली गहू, गोविंदभोग, ज्वारी, बाजरी, नाचणी अशी उत्तम पोषणमूल्यं असणारी पिकं घेण्याऐवजी ऊस, सोयाबीन, मका, बासमती, इंद्रायणी अशी पिकं फायदेशीर ठरतात. त्यामुळे पोषणसमता अधिक बिकट होत चालली आहे. एकुणातच, देशातील शेतीवर आणि खाद्यसंस्कृतीवर हरित क्रांतीचा प्रामुख्याने दुष्परिणाम होत गेला आहे. त्यामुळे आज आपला देश अन्नाच्या बाबतीत ना स्वयंपूर्ण आहे, ना सुरक्षित, ना हे अन्न पोषक आहे, अशी परिस्थिती झाली आहे.

**भाताच्या पारंपरिक जातींमध्ये पोषणक्षमता अधिक आहे, असं आपलं म्हणणं आहे का?**

हा केवळ मानण्याचा मुद्दा नव्हे. गेली पंचवीस वर्षं शेतकऱ्यांबरोबर काम करत आम्ही ते सिद्ध केलं आहे. पूर्वी वेगवेगळे भाताचे वाण वेगवेगळ्या कारणांसाठी वापरले जात. उदा. भाताचे काही विशिष्ट वाण आदिवासी जमातींमध्ये गरोदर महिलांना खायला देतात. त्यामागे नक्कीच पारंपरिक ज्ञान असणार अशी माझी खात्री होती. पण हे सिद्ध करण्यासाठी एक सुसज्ज प्रयोगशाळा हवी होती. ओडिशामध्ये तशी प्रयोगशाळा उपलब्ध नसल्याने मी स्वतः एक प्रयोगशाळा चालू करण्याचा धाडसी निर्णय घेतला. आमचे मित्र अविक साहा यांनी त्यासाठी सगळी आर्थिक मदत केली आणि कोलकत्यामध्ये जागाही देऊ केली. २०१४ साली ही प्रयोगशाळा सुरू झाली. इथे आम्ही तांदळाची बायो-केमिकल आणि मॉलिक्युलर चिकित्सा करतो. तांदळातील क्षार, खनिजं आणि पोषणक्षमता यांचा शोध घेतो. बियाणातील विशिष्ट घटकांची नोंद केली जाते आणि त्या बियाणांचं संकलनही केलं जातं. आपल्या पारंपरिक वाणांचं पेटंट कोणा परदेशी शास्त्रज्ञांनी घेऊ नये यासाठी आम्ही हे संशोधन आंतरराष्ट्रीय जर्नलमधून प्रकाशित करत असतो आणि ती माहिती शेतकऱ्यांपर्यंतही पोहोचवत असतो.

ही प्रयोगशाळा सुरू झाल्याने आम्हाला अनेक गोष्टींचा उलगडा झाला. आम्हाला भाताचे ८५ वाण मिळाले, ज्यात जी.एम. बियाणांहून २५ पट जास्त लोह आहे. मोन्सँन्टोच्या एका जातीत ८.९ मायक्रोग्राम लोह आहे, तर आपल्या काही देशी जातींमध्ये १४२ मायक्रोग्राम इतकं लोह आहे. असे अजून शेकडो वाण असतील, जे आमच्या प्रयोगशाळेत पोहोचलेलेच नाहीत. तसंच, कोणत्याही जी.एम. बियाणात बी-४ जीवनसत्त्व नाही, पण आपल्या सुमारे दोनशे जातींमध्ये उपयुक्त प्रमाणात

बी-४ आढळतं. बंगालमध्ये एक प्रकारचा तांदूळ पोटाच्या विकारांवर जालीम उपाय म्हणून दिला जातो. त्या जातीत आम्हाला मॉलिक्युलर चांदी मिळाली. आज नॅनो-सिल्व्हरचा वापर जंत मारण्यासाठी होतो हे आपल्याला माहिती आहेच. कबीरज साल नावाचा एक तांदूळ आजारपणातून बाहेर येणाऱ्या रुग्णांना दिला जातो. यात आम्हाला एक विशिष्ट प्रकारचे स्टार्च मिळाले, ज्याचं अमिनो ॲसिड तयार होतं. त्यामुळे प्रथिनं पचायला सोपी जातात आणि आजारी माणसाला पोषण मिळतं. अशा प्रकारे आम्ही प्रयोगशाळेच्या माध्यमातून पारंपरिक वाणांचे गुणधर्म शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहोत.

**पोषणक्षमता ग्राहकांना उपयुक्त आहे, पण पारंपरिक वाणाची शेती शेतकऱ्यांसाठी फायदेशीर आहे का?**

हादेखील हरित क्रांतीच्या माध्यमातून तयार झालेला गैरसमज आहे. आपला देश उष्ण कटिबंध प्रदेशात आहे. त्यामुळे देशातील हवामान, माती आणि भौगोलिक परिस्थिती भिन्न आहे. याउलट, समशीतोष्ण राष्ट्रांत इतकी विविधता नसते. त्यामुळे आपल्या प्रत्येक भागात भाताचे वेगवेगळे वाण होते. याचं कारण प्रत्येक वाणाची उत्पादनक्षमता, रोगांची प्रतिकारशक्ती, पाण्याची मागणी ही त्या त्या प्रदेशाशी संलग्न होती. याची अनेक उदाहरणं आहेत. आपल्याकडे बावीस प्रकारचे भात आहेत, ज्यांची पिकं अतिवृष्टी सहन करू शकतात. नदीपात्रात किंवा पाणथळ भागातही ती वाढू शकतात. पाण्याची पातळी फार वाढल्यास एका वाणाचं पीक बारा फुटांपर्यंत वाढतं. शेतकरी त्याची कापणी बोटीतून करतो! बंगालमधील एक वाण दोन आठवडे पाण्याखाली जगू शकतो आणि पाण्याची पातळी कमी झाली की पीक येतं. काही वाणांना लावणी झाल्यावर पाणी नसलं तरी चालतं. हे वाण कोरडवाहू जमिनीत उत्तम उत्पादन देतात. काही भाताचे वाण उतार जमिनीवर उत्तम पीक देतात. काही वाण जमिनीत पीक देतात, तर काही ओढ्यालगतच्या भागात. काही वाण मचूळ पाणी सहन करू शकतात, तर काहींमध्ये औषधी गुणधर्म आहेत.


हे सर्व वाण 'हाय यील्ड' म्हणजे 'अधिक उत्पादनाचे' नक्कीच नाहीत; परंतु दहा फुट पाण्यात, दुष्काळात किंवा पाणथळ जमिनीत हे नक्कीच जी.एम. पिकांपेक्षा अधिक उत्पादन देतात. पण ही बाब लक्षात घेतली जात नाही. शेतकरी बीज कंपन्यांवर विश्वास ठेवून सरसकट इंद्रायणी, बासमती अशी लागवड करतात.

इतकंच नव्हे, तर पारंपरिक वाणांचा शेतकऱ्यांना होणारा महत्त्वाचा फायदा म्हणजे या सर्व वाणांची बियाणं साठवून शेतकरी ती पुढच्या हंगामातही वापरू शकतो. शेतकऱ्याचा बियाणांवरचा खर्च पूर्ण वाचतो. या वाणांची शेती करण्यासाठी आम्ही 'ॲग्रो इकॉलॉजी'च्या तत्त्वांचा वापर करून शेती सुचवतो. यात मुख्यतः एकसुरी शेतीऐवजी निसर्गाची नक्कल करण्याचा प्रयत्न असतो. जैवविविधता जोपासणं आणि वाढवणं महत्त्वाचं असतं, ज्यामुळे नैसर्गिक क्रिया आणि देवाणघेवाण चालू होते. जैवविविधतेने अन्नसाखळी सक्रिय होते आणि या सर्वांचा परिणाम म्हणजे खत, पाणी आणि कीटकनाशकांची गरज कमी होतो. काही वर्षांतच उत्तम प्रकारे ॲग्रो इकॉलॉजिकल शेती सुरू होते आणि शेतकऱ्याला बाजारातून धान्य विकत घेण्याची गरज पडत नाही. आज बंगाल आणि ओडिशामध्ये अनेक शेतकरी या पद्धतीने शेती करत आहेत.

शेतकऱ्यांसाठीचा आणखी एक फायदा म्हणजे उत्तम पोषणमूल्यं असलेल्या तांदळाला अधिक बाजारभाव मिळतो. शहरातून आज अशा प्रकारच्या तांदळाची मागणी वाढत चालली आहे. खरोखर सेंद्रिय पद्धतीने देशी वाण काढणाऱ्या शेतकऱ्यांना याचा फायदा घेता येऊ शकतो.

**पारंपरिक बियाणांचा आणि शेतीच्या ॲग्रो इकॉलॉजिकल पद्धतीचा वापर वाढावा यासाठी काय प्रयत्न केले जात आहेत?**

देशी वाणांचं महत्त्व पटल्यावर १९९७ साली आम्ही सीडबँक म्हणजे बीज विनिमय केंद्र स्थापन केलं. याचं नाव आहे 'व्रीही'. संस्कृतमध्ये व्रीही म्हणजे भात. आज पूर्व भारतातील ही सर्वांत मोठी बीज बँक आहे. आम्ही जमवलेले पारंपरिक वाण इथे साठवून ठेवतो. 'बसुधा'मार्फत वाणांचं पीक घेतलं जातं आणि त्यापासून तयार झालेलं बीज 'व्रीही'मध्ये दाखल होतं. 'बसुधा'मधील शेतीत जनुकीय शुद्धता जपण्यास आम्ही काही विशिष्ट तंत्र वापरतो. त्यामुळे वाणांच्या प्रकारांचं एकमेकांमध्ये मिश्रण होत नाही. एका शुद्ध वाणाचा अभ्यास पूर्ण झाला की त्याची माहिती



**गुरुदास नूलकर** पर्यावरणीय व्यवस्थापनातील तज्ज्ञ असून इकॉलॉजिकल सोसायटीचे विश्वस्त आहेत. सिंबायोसिस सेंटर फॉर मॅनेजमेंट इथे ते प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

तयार केली जाते आणि ते वाण 'व्रीही'मध्ये उपलब्ध करून दिलं जातं. कोणीही शेतकरी येऊन योग्य बीज इथून घेऊन जाऊ शकतो. यासाठी शेतकऱ्याला एकही पैसा मोजावा लागत नाही. फक्त एक अट असते, ती म्हणजे त्याने आम्हाला दोन किलो देशी वाणाचं बीज द्यायला हवं. त्याच्याकडे आज बीज नसेल तर पीक आल्यावर बीज देण्याचं कबूल करून तो बीज घेऊन जाऊ शकतो. शेतकरी दूरवरचे असतील तर तिथल्या तिथे दुसऱ्या शेतकऱ्याला बीज दिलं तरी चालू शकतं. अशाने आमची बँक समृद्ध होत राहते, शेतकऱ्यांना मोफत बीज मिळतं आणि पारंपरिक वाणांचा प्रचार होत राहतो.

**या प्रसाराचा वेग आणि आवाका आणखी वाढावा या दृष्टीने यात सरकारी मदत होऊ शकणार नाही का?**

सरकार काही धोरणात्मक बदल करेल अशी चिन्हं आज तरी दिसत नाहीत. काही गोष्टी सरकारची वाट न बघता समाजाने केल्या पाहिजेत. भात संशोधन केंद्रांमधून आणि कृषी विद्यापीठांमधून पारंपरिक वाणांचा अभ्यास झाला, त्या संशोधनाचे पेपर आंतरराष्ट्रीय जर्नल्समधून प्रकाशित झाले की आपलं सरकार जागं होतं.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही माहिती शेतकऱ्यांपर्यंत जाणं सर्वाधिक गरजेचं आहे. आज शेतकऱ्याला माहिती मिळते ती बियाणांच्या कंपन्यांकडून. कंपन्या स्पष्टपणे काहीही म्हणत नसल्या तरी त्यांच्या आक्रमक जाहिरातींमुळे देशी वाण निकृष्ट आहेत असा शेतकऱ्यांचा समज होऊ शकतो. पण शेतकऱ्यांना चांगला अनुभव आला आणि त्यातून देशी बियाणांची मागणी वाढली तर नक्कीच सरकारदरबारी दखल घेतली जाईल. त्याचबरोबर काही पूर्वापार प्रथा आज नव्याने चालू करण्याची गरज आहे. पूर्वी घरी आलेल्या पाहुण्यांना भेट म्हणून आपल्याजवळचं खास वाण दिलं जात असे. प्रत्येक प्रांतात काही विशिष्ट वाण आहेत, ज्यांचा इतर ठिकाणी प्रचार होतो आणि पारंपरिक ज्ञानाची देवघेव होते. माझे अनेक स्नेही महाराष्ट्रात काम करतात. त्यांच्याकडून मला उत्तम देशी वाण मिळतात आणि आमच्याकडचे वाण आम्ही त्यांना देतो. ही देवाणघेवाण मोठ्या प्रमाणावर झाली पाहिजे. दुसरीकडे ग्राहकांना या विषयाबद्दल माहिती झाली, देशी वाणांच्या पोषणमूल्यांबद्दलची खात्री पटली तर त्यांच्याकडूनही देशी वाणांना अधिक मागणी येईल आणि त्यामुळे शेतकऱ्यांना ही पिकं घेण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. त्यामुळे विविध स्तरांवर ही चळवळ उभी राहिली पाहिजे, या प्रयत्नांत आम्ही आहोत.

■ **डॉ. देबाल देब**
http://cintdis.org/

■ **डॉ. गुरुदास नूलकर**
९८२२०३४५७९
gurudasn@gmail.com

**समकालीन प्रकाशनाचं ताजं पुस्तक**




**समकालीन प्रकाशन**

**नुक्कड** | **विजय खाडिलकर**

**सर्वत्र उपलब्ध**

शहराच्या झगमगाटापलीकडे गल्लीबोळांमध्ये वसलेल्या वस्त्यांबद्दल आपल्याला काय माहिती असतं?
एखाद्या वस्तीत डोकावून पाहिलं तर तिथे एक वेगळंच जग नांदताना दिसतं. हरतऱ्हेचे उद्योग करून पोट भरणारी नाना जातिधर्माची माणसं इथे एकमेकांना धरून आला दिवस साजरा करत असतात. आजची निराशा मागे टाकून उद्याची स्वप्नं पाहत असतात.

महानगरांच्या कुशीत लपलेल्या व्यामिश्र वस्त्यांमधले ताणेबाणे उलगडून दाखवणाऱ्या सकस कथा.

**संपर्क : मुंबई : ९८२०५२५५२३ ● पुणे : ९९२२४३३६०६**